# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.06.2026** **वारःसोमवार**

---

1. देशाचा आर्थिक आणि धोरणात्मक प्रभाव सुनिश्चित करण्यासाठी सागरी सामर्थ्य निर्णायक भूमिका असल्याचे पंतप्रधानांचे प्रतिपादन,
2. भारतासह जगभरात विविध ठिकाणी योगदिन उत्साहात साजरा, या दिनाचा जागतिक उत्सव केल्याबद्दल पंतप्रधानांकडून आभार व्यक्त.
3. अमेरिका-इराण शिष्टमंडळादरम्यान स्वित्झर्लंडमध्ये उच्चस्तरीय चर्चेला सुरुवात.
4. मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची सांगता, पोलिश चित्रपटाला सर्वोत्तम माहितीपटासाठीचा सुवर्ण शंख.

**पीएम-जहाज**

आधुनिक जगात सागरी सामर्थ्याला महत्त्व आहे. कोणत्याही देशाचा आर्थिक आणि धोरणात्मक प्रभाव सुनिश्चित करण्यासाठी सागरी सामर्थ्य निर्णायक भूमिका बजावत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल कोलकाता इथं केलं. या वास्तवाची भारताला जाणीव असून त्यानुसार देश क्षमता वृद्धिंगत करत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. पश्चिम बंगालमध्ये कोलकाता इथल्या डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी बंदरावरून तीन स्वदेशी बनावटीच्या नौदल जहाजांचे लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. नौदलाच्या अत्याधुनिक मध्यम आकाराच्या कमी आवाज करणाऱ्या आयएनएस दुनागिरी, सर्वेक्षण जहाज आयएनएस संशोधक आणि पाणबुडीविरोधी युद्ध क्षमता असणारे उथळ पाण्यातील आयएनएस अग्रय ही जहाजे काल नौदलात दाखल झाली. विकास, सुरक्षितता आणि समृद्धी यांचा महासागराशी निकट संबंध असल्याचे ते यावेळी म्हणाले. स्वदेशी बनावटीच्या या जहाजांच्या निर्मितीत 200 हून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांनी योगदान दिले आहे, याद्वारे आर्थिक घडामोडींना चालना मिळाल्याचेही मोदी यावेळी म्हणाले.

**आंतरराष्ट्रीय योग**

देशासह जगभरात काल आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. कोलकातामध्ये रेड रोडवर आयोजित मुख्य कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हजारो योगसाधकांच्या साथीने योगसाधना केली. यावेळी बोलताना योग हा मानसिक आरोग्यकडून शारीरिक आरोग्याकडे नेणारा मार्ग असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देखील मध्यप्रदेशातील जबलपूर इथं गॅरिसन मैदानावर आयोजित योग दिवसाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. यंदाच्या योगदिनाचे विषयसूत्र निरोगी वृद्धत्वासाठी योग असे होते. यावेळी बोलताना राष्ट्रपती म्हणाल्या की योग मानवजातीला निरोगी, संतुलित आणि अर्थपूर्ण जीवनाचा मार्ग दाखवतो. भारताच्या महान परंपरेचा तो उत्सव आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही लेहमध्ये योग दिन साजरा केला. योग हा केवळ शारीरिक व्यायामाचा प्रकार नसून तो भारताने मानवजातीला दिलेली प्राचीन देणगी आहे, असं राधाकृष्णन यावेळी म्हणाले.

परदेशातही अनेक देशांमध्ये योगसाधना करण्यात आली. नेपाळमध्येही काठमांडू आणि बिरगंज इथल्या भारतीय दुतावासांनी विविध 22 योग कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. 13 हजारांहून अधिक योगप्रेमी मंडळी यात सहभागी झाली होती. संयुक्त अरब अमिरातीमध्ये हजारो नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर योग सत्रांचे आयोजन करण्यात आलं होतं. दुबईमध्ये भारताच्या वाणिज्य दुतावासाने दुबई पोलिस ऑफिसर्स क्लबमध्ये योग सत्राचे आयोजन केले होते. तर अबूधाबीमध्ये हजारभर योगसाधक आणि राजनैतिक अधिकारी यांनी योगाचा सराव केला. इस्रायलमध्येही मोठ्या प्रमाणावर योगसाधना करण्यात आली. यामध्ये पाचशेहून अधिक लोकांनी सहभाग नोंदवला. तेल अवीव याफो बंदरावर जमलेल्या लोकांनी 108 सूर्यनमस्कार घातले. इस्रायलमध्ये नियमित योगसाधकांची संख्या मोठी आहे.

**पीएम योग**

आंतरराष्ट्रीय योग दिनाला जागतिक पातळीवर उत्सव बनवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभरातील लोकांचे आभार मानले आहेत. समाज माध्यमांवरून लिहिलेल्या संदेशात त्यांनी आरोग्य आणि सुदृढतेच्या सामायिक ध्येयासाठी विविध क्षेत्रांतील, विविध देशांतील लोक योगाभ्यासामुळे एकत्र येतात हे पाहणे आनंददायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

**राष्ट्रपती कुनो भेट**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज मध्यप्रदेशातल्या शेओपूर जिल्ह्यातील कुनो राष्ट्रीय उद्यानाला भेट दिली. या भेटीत त्यांनी जंगलातून फेरफटका मारत चित्ता पुनर्वसन प्रकल्पात झालेल्या प्रगतीची माहिती घेतली. या उद्यानात चित्ता मित्र म्हणून काम करणारे सहारिया जमातीचे सदस्य, चित्यांच्या माग ठेवणारे कार्यकर्ते, वन विभागाचे स्थानिक कर्मचारी आणि गाईड यांच्याशी संवाद साधत हा प्रकल्प राबवत असताना त्यांना आलेले अनुभव जाणून घेतले.

**बेस्ट**

महाराष्ट्रामध्ये मुंबईत दैनंदिन बससेवा पुरवणाऱ्या बेस्टच्या कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप काल रात्री मागे घेतला आहे. बेस्ट कर्मचारी संघटना आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यादरम्यान झालेल्या भेटीनंतर हा संप मागे घेतला. बैठकीत मान्य झाल्यानुसार, बेस्ट कर्मचाऱ्यांना दरमहा 3,000 रुपयांची अंतरिम वेतनवाढ मिळेल, तर वेतनाचा नवीन करार अंतिम होईपर्यंत 'वेट-लीज' तत्त्वावरील कंत्राटी चालकांसह संबंधित कर्मचाऱ्यांना दरमहा 2,000 रुपये मिळतील, अशी घोषणा शिंदे यांनी केली. तसंच, कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युइटी म्हणजे उपदानाची रक्कम वर्तमान आर्थिक वर्षातच देण्याचे निर्देशही त्यांनी बेस्ट प्रशासनाला दिले.

**अमेरिका-इराण**

अमेरिका आणि इराणच्या शिष्टमंडळांदरम्यान स्वित्झर्लंड इथं उच्चस्तरीय चर्चेला सुरुवात झाली आहे. दोन्ही देशांदरम्यान झालेल्या अंतरिम कराराला बळकटी देणे आणि पश्चिम आशियातील संघर्ष संपवण्याच्या प्रयत्नांना गती देणे हा या चर्चेचा उद्देश आहे. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी व्हान्स अमेरिकेच्या शिष्टमंडळाचे तर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची आणि सभापती मोहम्मद बागेर घलिबाफ इराणच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व करत आहेत. या चर्चेत कतार आणि पाकिस्तान मध्यस्थाची भूमिका बजावत आहे. दरम्यान, इस्त्रायलकडून लेबनानवर होत असलेल्या सततच्या हल्ल्यांमुळे होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा बंद करत असल्याचे इराणने जाहीर केले आहे. त्या पार्श्वभूमीवर ही बैठक होत आहे. मात्र अमेरिकेच्या लष्कराने हा जलमार्ग सर्व जहाजांसाठी खुला असल्याचे म्हटले आहे.

**बिक्स भारत**

दिल्लीत आजपासून दोन दिवसांच्या ब्रिक्स देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांची बैठकीला सुरुवात होत आहे. देशाचे सुरक्षा सल्लागार अजित डोभाल अध्यक्षस्थानी असतील. ब्रिक्स गटातील 11 सदस्य देशांचे सुरक्षा प्रमुख यामध्ये सहभागी होत आहेत. जगसमोर असलेली अपारंपरिक सुरक्षितता आव्हानं या विषयावर बैठक केंद्रित असेल. राष्ट्रीय सुरक्षेला असलेल्या धोक्याचे वेगाने बदलते स्वरूप आमि आगामी सुरक्षा संदर्भातील धोक्यांमध्ये नव्या तंत्रज्ञानाची भूमिका यांवर चर्चा होणार आहे.

**यूके-पीएम**

ब्रिटनचे पंतप्रधान आणि मजूर पक्षाचे नेते कीर स्टार्मर यांनी पदावरून पायउतार व्हावं यासाठी त्यांच्यावर त्यांच्या पक्षातूनच दबाव वाढत आहे. स्टार्मर यांचे पक्षातील विरोधक त्यांच्याजागी अँडी बर्नहॅम यांची वर्णी लावली जावी अशी मागणी करत आहेत. उत्तर इंग्लंडमधील मेकरफील्ड मतदारसंघात नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीत बर्नहॅम यांनी निर्णायक विजय मिळवून नायजेल फराज यांच्या रिफॉर्म यूके पक्षाच्या उमेदवाराला पराभूत केल्यानंतर या मागणीनं जोर धरला आहे. दरम्यान पक्षाचं नेतेपद आपल्याकडेच रहावं आणि त्यासाठी वेळ पडल्यास निवडणूक लढवण्यासही आपण तयार आहोत या भूमिकेवर

स्टार्मर अद्यापही ठाम आहेत. संपूर्ण इंग्लंड आणि वेल्समध्ये झालेल्या स्थानिक निवडणुकांमध्ये पक्षाला आलेल्या अपयशानंतर पंतप्रधान स्टार्मर यांनी पद सोडावं अशी मागणी होत आहे.

**पुन्हा नीट**

पदवीपूर्व वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची नीट यूजीची पुनर्परीक्षा कडकोट सुरक्षा व्यवस्थेत काल पार पडली. राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं दिलेल्या माहितीनुसार देशभरातली 5 हजार 440 आणि परदेशांतील 14 केंद्रांवर 20 लाखाहून अधिक उमेदवारांनी पुनर्परीक्षा दिली. एकंदर 13 भाषांमध्ये ही परीक्षा पार पडली. परीक्षार्थींमध्ये 10 हजारांहून अधिक दिव्यांग व्यक्तींचा समावेश होता.

**तामिळनाडू वायू गळती**

तामिळनाडूमध्ये मासे निर्यात कंपनीमध्ये झालेल्या अमोनिआ वायू गळतीच्या घटनेत काल किमान सात जणांना आपले प्राण गमवावे लागले. तर सत्तरहून अधिक कामगार बाधित झाले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि इतर आपत्ती सुरक्षा दलाच्या विशेष पथकानं तातडीनं बचाव कार्य सुरू केले. मुख्यमंत्री सी जोसेफ विजय यांनी घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. शिवाय मृतांच्या कुटुंबियांना दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**मिफ**

मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची काल सांगता झाली. सात दिवसांच्या या सोहळ्याचा समारोप महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत पार पडला. महोत्सवात सिल्व्हर या पोलिश चित्रपटाला सर्वोत्तम माहितीपटासाठीचा सुवर्ण शंख प्राप्त झाला. तर मायाज् साँग या चित्रपटाला सर्वोत्तम ॲनिमेशनपटाचा रौप्य शंख मिळाला. अंडर द स्नो चित्रपटाला सर्वोत्तम लघुकथेवर आधारित चित्रपटाचा रौप्य शंख मिळाला. राष्ट्रीय स्पर्धा विभागात सर्वोत्कृष्ट ॲनिमेशन पटासाठी आर्मस्ट्राँग फ्रॉम अंगालम्मन स्ट्रीट या चित्रपटाला गौरवण्यात आलं. स्मॉल क्लाउड या चित्रपटाला सर्वोत्तम लघुकथेवर आधारित, तर वाई या चित्रपटाला सर्वोत्तम माहितीपटाचा रौप्य शंख प्राप्त झाला. द ओल्ड बुल नोज ऑर वन्स न्यू या चित्रपटाला सर्वोत्तम चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. तर 'विकसित भारत/वंदे मातरमची 150 वर्षे/भारत@2026' या विषयावरील सर्वोत्तम लघुपटाचा पुरस्कार 'द लास्ट शेल्टर' या चित्रपटाला मिळाला. सर्वोत्कृष्ट पदार्पणाचा दिग्दर्शकासाठीचा दादासाहेब फाळके चित्रनगरी पुरस्कार पूजा तोलानी यांना प्रदान करण्यात आला.

**हॉकी**

महिलांच्या एफआयएच नेशन्स करंडक स्पर्धेच्या विजेतेपदावर भारतीय हॉकी संघाने दुसऱ्यांदा आपलं नाव कोरलं आहे. या विजयामुळे एफआयएच महिला प्रो लीगमध्ये संघाला स्थान मिळाले आहे. या विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी महिला संघाचे अभिनंद केलं आहे. हा विजय संघाची कठोर मेहनत, समर्पण आणि सांघिक कार्याचे प्रदर्शन असल्याचं त्यांनी समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.